ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

## Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 206
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : मंगळवार, दिनांक 03 फेब्रुवारी, 2026
**(Day and Date)** : Tuesday, 03 February, 2026

**वेळ** (Time) : दुपारी 3.30 वाजता (3.30pm)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 206 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 206 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दिनांक 03 फेब्रुवारी, 2026 रोजी दुपारी 2.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू<br>बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 05 | मा. श्री. प्रसेनजित श्रीकृष्णा फडणवीस, पुणे | सदस्य |
| 06 | मा. डॉ. दत्तात्रय मनोहर गुजराथी, नाशिक | सदस्य |
| 07 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन,<br>इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | सदस्य |
| 08 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | सदस्य |
| 09 | डॉ. अक्षया निकुंभ, मुंबई | सदस्य |
| 10 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी<br>श्री. अनिल गावित नाशिक | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 11 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| 12 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | निमंत्रित सदस्य |
| 13 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी आणि<br>प्र-कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

## व्यवस्थापन मंडळ बैठक
## Board of Management Meeting
## कार्यवृत्त (Minutes of the Meeting)

मंगळवार, दिनांक 03 फेब्रुवारी, 2026
Tuesday, 03 February, 2025

वेळ – दुपारी 3.30 वाजता
**Time : 3.30 pm**

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 206.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | | मा. कुलगुरूंनी विद्यापीठाच्या वाटचालीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br>1. राष्ट्रीय पुस्तक न्यासद्वारे पुणे येथे झालेल्या 'पुणे बूक फेस्टिवल'मध्ये भगवान बिरसा मुंडा आदिवासी संस्कृती वारसा दालन (Tribal Cultural Heritage) मध्ये भारतीय आदिवासी भाषेतील भाषा व संस्कृती यांची माहिती सांगणारे 2600 पेक्षा जास्त पोस्टर्स प्रदर्शित केले होते त्यापैकी 1678 पोस्टर्सची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या टिमने दखल घेऊन प्रदर्शनात मांडण्यात आले. हे प्रदर्शन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि RISC Foundation All India द्वारे दि. 12 डिसेंबर, 2025 रोजी प्रदर्शित करण्यात आले होते. एकाच जागी भाषा व संस्कृतीचा विश्वविक्रम 'गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद घेण्यात आली.<br>2. महानगरपालिका निवडणूका आचारसंहिता कालावधीतही विद्यापीठाच्या सर्व परीक्षा विना अडथळा पार पाडण्यात आल्या आहेत.<br>3. NEP 2020 आधारीत आपण DEB कडे मान्यतेसाठी पाठविलेल्या सर्व शिक्षणक्रमांना मान्यता देण्यात आली आहे.<br>4. विद्यापीठाचे नवीन प्रवेश संख्या मागील दोन वर्षांपेक्षा वाढली असून 1.50 लाखाचा टप्पा गाठला आहे.<br>5. विद्यापीठाने तीन वेगवेगळ्या ठिकाणी रोजगार मेळावे आयोजित केले होते. यातून विविध कंपन्यांमध्ये आलेल्या मेळाव्यांमधून काही विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे. |

**206.2**

**206.2.1** **दिनांक 30 डिसेंबर, 2026 रोजी झालेल्या 205 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे...**

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 30 डिसेंबर, 2026 रोजी झालेल्या 205 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार कार्यवृत्त सर्वानुमते मान्यता देऊन कायम करण्यात आले.

**206.2.2** **दिनांक 30 डिसेंबर, 2025 रोजी झालेल्या 205 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल अवलोकनार्थ सादर ...**

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 30 डिसेंबर, 2026 रोजी झालेल्या 205 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाही अहवालास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**206.3** **सखोल चर्चेचे विषय**

**206.3.1** (परीक्षा कक्ष) **विद्यापीठाच्या एकतीसावा दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदव्या व पदविकांना मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी** — विद्यापीठाचा एकतीसावा दीक्षांत समारंभ दि. 4 फेब्रुवारी, 2026 रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला आहे. या दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे जानेवारी 2025, माहे मार्च 2025 व मे/जून 2025 या परीक्षांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या व संशोधन पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पदव्या व पदविका प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर

| Sr. No. | Details | Total Degree/Diploma to be awarded in 31st Convocation |
|---|---|---|
| 01 | Diploma | 12,637 |
| 02 | Degree | 90,708 |
| 03 | PG Degree | 20,571 |
| 04 | Ph.D. | 05 |
| | | 1,23,921 |

मान्यतेस्तव सादर ...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विद्यापीठाच्या 31 व्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे जानेवारी 2025, मार्च 2025 व मे/जून 2025 परीक्षांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या व संशोधनातील विद्यावाचस्पती (Ph.D.) पदव्यांची सांख्यिकीय माहिती परीक्षा नियंत्रकांनी सादरीकरणाद्वारे मा. विद्वत परिषदेसमोर विशद केली.

या समारंभात प्रामुख्याने स्त्री- पुरुष वर्ग व वयानुसार 60 वर्षांवरील 208 विद्यार्थी, 68 कैदी बांधव व 77 दृष्टिहीन विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

दीक्षांत समारंभानंतर विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणारी पदवी व पदविका प्रमाणपत्रे वैशिष्ट्यपूर्ण असून त्यावर 12 अंकी APAAR ID/ABC ID अंकित केलेला आहे तसेच प्रमाणपत्रावर Block Chain वर आधारित QR Code छापलेला असून, तो

| | | |
|---|---|---|
| | | स्कॅन करून प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करता येऊ शकेल. यामुळे पडताळणी प्रक्रियेसाठी लागणाऱ्या वेळेची बचत होणार आहे.<br>NAD अंतर्गत DigiLocker पोर्टलवर पदवी / पदविका प्रमाणपत्राची डिजिटल ई-कॉपी दीक्षांत समारंभ संपल्यानंतर तत्काळ उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच DigiLocker पोर्टल व्यतिरिक्त पदवी / पदविका प्रमाणपत्राची डिजिटल कॉपी 'ई-सुविधा' मोबाईल ॲपमध्ये कायमस्वरूपी उपलब्ध राहील.<br>मुळ प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना नेहमीच्या विहित पद्धतीनुसार पाठविण्यात येईल.<br><br>परीक्षा विभागाकडून डिजिटल पद्धतीने दिल्या जाणाऱ्या उपक्रमांबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी परीक्षा नियंत्रक व परीक्षा विभागाचे अभिनंदन केले.<br>मा. विद्वत परिषदेने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली व सदर ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| | 206.3.2<br>बांधकाम कक्ष | **विद्यापीठ परिसरात असलेल्या टेलीफोन एक्सचेंज व टेलीकॉम टॉवर यांना जागा व वीजपुरवठा विद्यापीठाने दिलेला आहे. त्याकरिता आकारण्यात येणाऱ्या वीज बिलाचे प्रति युनिटचे दर कमी करणेबाबत भारत संचार निगम लिमिटेड यांचे दि. 08.12.2025 चे विनंती पत्र मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठ परिसरातील टेलिफोन एक्सचेंजला विद्यापीठाचा वीजपुरवठा जोडण्यात आलेला आहे. भारत संचार निगम लिमिटेड यांना दरमहा वीजपुरवठा दिल्याबद्दल वीज आकारणी केली जाते.<br>यापूर्वी भारत संचार निगम लिमिटेड यांना त्यांनी दरमहा वापरलेल्या वीजयुनिट वर र.रु. 40 प्रती युनिट अशी आकारणी केली जाते. तथापि उपरोक्त संदर्भ क्र.1अन्वये भारत संचार निगम लिमिटेड यांनी प्रती युनिट वीजदर कमी करणेबाबत विनंती केली आहे.<br>सबब प्रस्थावित केल्याप्रमाणे भारत संचार निगम लिमिटेड यांना वीजबिल देतांना खालीलप्रमाणे आकारणी करणे योग्य राहील.<br>1) Energy Charges<br>2) Wheeling Charges<br>3) Tax on Sale<br>म्हणजेच वीजबील आकारणी करतांना प्रत्येक महिन्यास वापरलेल्या युनिट्सवर उपरोक्त तीन चार्जेस लावून वीजबील द्यावे लागेल. म.रा.वी.वि कंपनीने वेळोवेळी बदल केलेल्या वीजदरानुसार आकारणी करणेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – भारत संचार निगम लिमिटेड यांना वीजबिल देतांना सादर केलेल्या वीजबिलापोटी प्रती युनिट रु. 15/- प्रमाणे आकारणी करण्याच्या प्रस्तावास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 206.3.3<br>प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र | **Adjunct Professor पद भरणेसंदर्भातील विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** - विकसित भारत @२०४७ चे ध्येय साधण्यासाठी उपयोजनात्मक संशोधनाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने NEP 2020 मध्येही संशोधनाला महत्वाचे स्थान दिलेले आहे. विद्यापीठात संशोधन कार्याला दिशा मिळण्यासाठी दि. ०१ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रामार्फत संशोधनासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे, विद्यापीठात संशोधनात्मक संस्कृती रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबवणे अपेक्षित |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. विद्यापीठाला या संशोधन केंद्रामुळे संशोधनाचा नवीन आयाम प्राप्त होणार आहे. इमरटस प्रो. कविता साळुंके यांच्याकडे सदर संशोधन केंद्राचा कार्यभार सोपविण्यात आला होता. परंतु त्या सध्या विद्यापीठात कार्यरत नाहीत. या केंद्रामार्फत विद्यापीठातील व विद्यापीठाबाहेरील संशोधकांना सातत्याने मार्गदर्शन करण्यात येत/येणार आहे.<br><br>विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 7140016_Guidelines-Empanelment-of-Adjunct -Faculty-University-and-Colleges मधील नियमांनुसार Adjunct Professor नियुक्तीसंदर्भात निकष दिलेले आहेत. (सहपत्र ०१) तसेच त्या आधारे आपल्या विद्यापीठाच्या Guidelines for Appointment of Adjunct Professor in YCMOU तयार केल्या आहेत. (सहपत्र ०२) त्या अनुषंगाने प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रासाठी एक Adjunct Professor Adjunct Professor नियुक्त करण्यासंदर्भात तसेच Guidelines for Appointment of Adjunct Professor in YCMOU यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विकसित भारत @२०४७ चे ध्येय साधण्यासाठी उपयोजनात्मक संशोधनाची गरज लक्षात घेऊन NEP 2020 मध्येही संशोधनाला महत्वाचे स्थान दिलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित विद्यापीठातील प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रात Adjunct Professor या पदासाठी Guidelines for Appointment of Adjunct Professor in YCMOU केलेल्या नियमावली यु.जी.सी. च्या नियमाप्रमाणे असल्याची खात्री करावी. Adjunct Professor नियुक्तीसाठी यु.जी.सी. च्या नियमानुसार Search Committee करून त्यावर निर्णय घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 206.3.4<br>परीक्षा विभाग | **विषय: सुवर्णपदक वितरणाबाबत तयार केलेल्या नियमावलीत (Regulations) सुधारणा करणेबाबत गठीत समितीच्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** - दिनांक 28 एप्रिल, 2025 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 201.3.3 अन्वये सुवर्णपदक प्रदान करण्याच्या नियमावलीत सुधारणा तयार करण्यासाठी मा. कुलगुरू महोदय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.<br>त्याअनुषंगाने विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या स्नातकांना सुवर्णपदक प्रदान करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या दिनांक २९ डिसेंबर, २०२५ आणि दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकींमध्ये सविस्तर चर्चा करून शिफारशी करण्यात आलेल्या आहेत, सदर समितीचा अहवाल सोबत जोडलेला आहे.<br>प्रस्ताव — 1) गठीत केलेल्या समितीने सुवर्णपदक वितरणाबाबत केलेल्या शिफारशींना मान्यता मिळणेबाबत मान्यतेस्तव सादर.<br>2) तसेच समितीने केलेल्या शिफारशींनुसार YCMOU ने प्रायोजित केलेले M.Ed शिक्षणक्रम बंद झालेला असल्याने या शिक्षणक्रमांचे सुवर्णपदक M.A Education शिक्षणक्रमास 31 व्या दिक्षांत समारंभापासून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास वितरीत करण्याच्या मान्यतेस्तव सादर. |

3) समितीने तयार केलेल्या शिफारशीनुसार सद्यस्थितीतील नियमनात (Regulations) सुधारणा करणेसाठी मान्यतेस्तव सादर.

वरीलप्रमाणे विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – सुवर्णपदक वितरण नियमावली समितीने केलेल्या शिफारशींबाबत मा. सदस्यांना अवगत करून देण्यात आले.

1. सुवर्णपदक प्रायोजित करावयाचे असल्यास अशा दात्यांकडून रु. 2,51,000/- अनामत रक्कम स्विकारण्यात यावी.
2. सुवर्णपदक वितरणाबाबत तयार केलेल्या नियमावलीत (Regulations) सुधारणा करणेबाबत गठीत केलेल्या समितीने सुवर्णपदक वितरणाबाबत सादर केलेल्या अहवालातील शिफारशींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
3. विद्यापीठामार्फत दिले जाणारे Master of Eduation साठीचे सुवर्णपदक M.A. Education या शिक्षणक्रमासाठी 31 व्या दीक्षांत समारंभापासून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
4. समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार सद्यस्थितील नियमावलीमध्ये (Regulation) बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

206.3.5
कृषी विज्ञान विद्याशाखा

**कृषिविज्ञान विद्याशाखेंतर्गत पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन कार्यासाठी प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेच्या लेखन आणि संपादन मानधन दराबाबत व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 198.4.8 मध्ये दुरूस्ती करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**

**टिपणी** – ठराव क्र. 198.4.8 च्या टिपणीमध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

| | |
|---|---|
| संपादन कार्यासाठी – 6000/- प्रती श्रेयांक (10 ते 12 प्रात्यक्षिके – साधारणपणे 200 पाने) | रूपये 5000/- प्रती श्रेयांक (10 ते 12 प्रात्यक्षिके – साधारणपणे 150 पाने) |

सदर टिपणीमध्ये NEP नुसार प्रति श्रेयांक (4-5 प्रात्यक्षिके – 50 पाने) असे असणे अपेक्षित आहे.

यास्तव व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 198.4.8 च्या टिपणीमध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर...

| | |
|---|---|
| संपादन कार्यासाठी – 6000/- प्रती श्रेयांक (4 ते 5 प्रात्यक्षिके – साधारणपणे 50 पाने) | रूपये 5000/- प्रती श्रेयांक (4 ते प्रात्यक्षिके – साधारणपणे 50 पाने) |

(सदर ठरावानुसार प्रात्यक्षिक पुस्तिकेसाठी अ.क्र. 01 व 02 करिता रूपये 4000/- मानधन देण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यात कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.)

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 198.4.8 च्या टिपणीमध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

| | |
|---|---|
| संपादन कार्यासाठी – 6000/- प्रती श्रेयांक (4 ते 5 प्रात्यक्षिके – साधारणपणे 50 पाने) | रूपये 5000/- प्रती श्रेयांक (4 ते 5 प्रात्यक्षिके – साधारणपणे 50 पाने) |

| | | |
|---|---|---|
| | 206.3.6<br>वित्त विभाग | **विद्याभारती संस्था, वर्धा यांच्या विनंतीनुसार बेसा, नागपूर येथील त्यांच्या शैक्षणिक संकुलात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व कौशल्य विकास केंद्र सुरू करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** - विद्याभारती संस्था वर्धा यांनी त्यांच्या प्रस्ताव क्र. VBS/YCMOU/2025-26/20 दि. 05.01.2026 च्या पत्रानुसार त्यांच्या बेसा, नागपूर येथील शैक्षणिक संकुलात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करणेबाबत विनंती केली आहे. प्रस्तावात त्यांनी खालीलप्रमाणे प्रस्तावित केले आहे.<br>विद्याभारती संस्था, वर्धा या त्यांच्या संस्थेमार्फत वर्धा, नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यात शैक्षणिक संकुलातून अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या अभ्यासक्रमास प्रवेशीत असतात. संस्थेकडे स्वत:च्या मालकीची वरील नमूद जिल्ह्यात विविध ठिकाणी जागा असून त्यावर भव्य व सुसज्य इमारती आहेत. सध्या सदर संस्थेत पाच हजारापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.<br>संस्थेची बेसा, नागपूर येथे सर्वे नं. 74, उन्नती पार्क, नागपूर येथे असलेल्या शैक्षणिक संकुलात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व कौशल्य विकास केंद्र सुरु करण्याचा संस्थेचा मानस आहे. सदर इमारत नागपूर शहरात आहे. विदर्भातील अनेक विद्यार्थी नागपूर येथे स्पर्धा परीक्षा तयारीसाठी येतात मात्र त्यांना योग्य ते मार्गदर्शन तज्ञांकडून माफक दारात मिळत नाही त्यामुळे अनेक आदिवासी व इतर शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सदर शिक्षणाच्या अडचणी निर्माण होत आहेत.<br>विद्यापीठ व संस्था यांच्यात सामंजस्य करार करून शिक्षणातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विविध कौशल्य विकास केंद्र स्थापन करावे असा संस्थेचा मानस आहे. यासाठी संस्था बेसा, नागपूर येथे असलेल्या शिक्षण संकुलातील असलेल्या इमारतीत या कामासाठी जागा उपलब्ध करून देईल. तसेच त्यात आवश्यकतेप्रमाणे बदल करून विविध दालने उपलब्ध करून देण्यात येतील ज्यात स्पर्धा परीक्षा ग्रंथालय, मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हॉल, वाचनालय, ऑफिस, कौशल्य विकासासाठी आवश्यक हॉल व स्वतंत्र स्वच्छतागृहे इ. बाबी संस्था उपलब्ध करून देईल.<br>तरी विद्यापीठाचे बोपोडी, पुणे येथे सुरु केलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका ही सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्याची माहिती संस्थेला असल्याचे त्यांनी त्यांच्या पत्रात नमुद केले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त संस्था देखील विद्यापीठाने हाती घेतलेले कार्य विदर्भातील विद्यार्थ्यासाठी पुढे चालू ठेवण्याच्या अनुषंगाने कार्य करण्यास तयार आहे. सदर ज्ञानदानाची संधी विद्यापीठाने संस्थेला द्यावी अशी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत चर्चेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — उपरोक्त विषयावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती उपरोक्त प्रस्तावित विषय हा विद्यापीठाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. विद्यापीठाने यापूर्वी पुणे महानगर पालिकेच्या बोपोडी येथील स्कुल भाडे तत्वावर घेऊन तेथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र तसेच सुसज्ज अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी तयार केली आहे. त्याचप्रमाणे विद्याभारती संस्था, वर्धा यांच्या बेसा, नागपूर येथील संकुलातील इमारतीमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, संगणक एज्युकेशनकरिता लॅब, अभ्यासिका, कार्यालय इत्यादी सुरू केल्यास विदर्भातील विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितपणाने फायदा होऊ शकतो अशा आशयाची सविस्तर चर्चा झाली. सदर सेंटर अत्यंत अधुनिक पध्दतीने तयार करण्यात यावे असेही ठरले. विद्याभारती संस्था त्यांच्या प्रस्तावात नमुद केल्यानुसार बांधकामाचे फेरबदल करून |

| | | |
|---|---|---|
| | | देईल तो खर्च विद्यापीठास देय राहणार नाही. सदर जागेवर Interactive / Computer Lab, अभ्यासिका, ग्रंथालय, लेक्चर हॉल, कार्यालय इत्यादी बाबींसाठी लागणारे फर्निचर व साहित्य विद्यापीठाकडून करण्यात येईल असेही सर्वानुमते ठरले.<br>यासाठी सदर संस्थेबरोबर सामंजस्य करार करून भाडे निश्चिती शासकीय दराप्रमाणे करून घेण्यात यावी व त्वरीत सदर केंद्राची उभारणी तातडीने करून कार्यान्वित करावी असेही सर्वानुमते ठरले. यासाठी विद्यापीठाकडून होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 206.3.7<br>वित्त विभाग | **दि. 31 जानेवारी, 2026 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — दि. 31 जानेवारी, 2026 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — दि. 31 जानेवारी, 2026 रोजी वित्त समिती बैठकीचे इतिवृत्तावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत वित्त समिती ठराव क्र. 1,2,3,6,7,8,9 व कार्योत्तर मान्यतेचा विषय क्र. 01 करिता सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>विषय क्र. 04 व 05 मध्ये बांधकाम कक्षाने प्रस्तावित केल्यानुसार दि. 13 जानेवारी, 2026 रोजी झालेल्या बांधकाम समितीची बैठक क्र 188 व दि. 27 जानेवारी, 2026 रोजी झालेल्या बांधकाम समितीची बैठक क्र 189 च्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेनुसार सर्व विषय तसेच यापूर्वी झालेल्या सर्व बांधकाम समितीच्या इतिवृत्तातील विषयाबाबत बांधकाम विभागाने सादर केलेली तांत्रिक माहिती त्या-त्या बांधकामाच्या संदर्भाने असलेल्या सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक व स्थापत्तीय दृष्ट्या तपासली असल्याचे संबंधीत विभागाने बांधकाम समिती बैठकीत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारीने प्रस्तावित केलेले असल्याचे सांगितले. त्यानुसार अंतिम केलेले इतिवृत्त वित्त समितीच्या बैठकीत ठेवण्यात आले होते. त्यास संबंधीत विभागाच्या जबाबदारीवर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>**विषय क्र. 10** च्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. नांदेड विभागीय केंद्राची इमारत वापरण्यायोग्य नसल्याकारणाने ती पाडून नवीन इमारत त्या जागी उभी करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीत सदर विभागीय केंद्राचे कार्यालय सुरू ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या समोरील खाजगी संस्थेची जागा कार्यालयासाठी भाडे तत्वावर घेणे योग्य आहे असे संबंधीत संचालकांनी कळविले आहे. सदर जागेचे भाडे निश्चितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे निश्चिती शाखेकडे प्रस्ताव दाखल झालेला आहे. सदर भाडे निश्चिती झाल्यानंतर प्रत्यक्ष देय रकमेची अदायगी करण्यास्तव विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे. त्यास वित्त समितीने मान्यता प्रदान केली आहे. तथा अंतिम मान्यतेसाठी सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे सुचविले होते. त्यानुसार सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठरले.<br>1 सदर इमारतीतील विभागीय कार्यालय त्वरीत बंद करून विभागीय संचालकांनी सुचविल्याप्रमाणे तेथील विद्यापीठासमोरील खाजगी संस्थेच्या / मालकीच्या जागेत विभागीय कार्यालय स्थलांतरीत करावे. |

<table>
<tr><td></td><td></td><td>2 संबंधीत इमारत मालकासमवेत भाडे निश्चिती करण्यात यावी. शासनाच्या नियमानुसार भाडे निश्चिती व्हावी.<br>3 सदर इमारत पुर्णत: रिकामी करून इमारत पाडण्यात यावी.<br>4 विद्यापीठाच्या बांधकाम विभागाने इमारत पाडणे व नव्याने इमारत बांधकाम करण्यासाठी येणाऱ्या आर्थिक तरतुदीबाबत बांधकाम समितीमध्ये मान्यता घेऊन वित्त समिती व मा. व्यवस्थापन मंडळाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.<br>5 विद्यापीठाच्या बांधकाम विभागाने सदर इमारत बांधकाम त्वरीत होण्याच्या दृष्टीने तातडीने व जबाबदारीने कार्यवाही करावी.<br>6 विभागीय कार्यालय स्थलांतरीत करण्यासाठी होणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.</td></tr>
<tr><td>206.4</td><td></td><td>मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय</td></tr>
<tr><td></td><td>206.4.1<br>विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र</td><td>विद्यापीठाकडून दिले जाणारे बाबुराव बागुल कथा परुस्कार, रुख्मिणी पुरस्कार, श्रमसेवा पुरस्कार, ज्ञानदीप पुरस्कार, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार नियमावलीचे अद्यावतीकरण बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>टिपणी — विद्यापीठाकडून दिले जाणारे बाबुराव बागुल कथा परुस्कार, रुख्मिणी पुरस्कार, श्रमसेवा पुरस्कार, ज्ञानदीप पुरस्कार, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार नियमावलीचे अद्यावतीकरण समिती बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>व्यवस्थापन मंडळ ठराव — विद्यापीठाकडून दिले जाणारे वरील विविध पुरस्कार अद्यावतीकरण समितीने सादर केलेले इतिवृत्त व नियमावलीस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली तसेच हे पुरस्कार 2026 पासून पुन्हा सुरु करण्यात यावेत असेही सुचित करण्यात आले.</td></tr>
<tr><td></td><td>206.4.2<br>ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखा</td><td>ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखेच्या वतीने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (MahaIT), मुंबई यांच्याशी सामंजस्य करार करून डिजिटल प्रशासन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>टिपणी — ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखेच्या वतीने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (MahaIT), मुंबई यांच्याशी सामंजस्य करार करून डिजिटल प्रशासन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...<br><br>व्यवस्थापन मंडळ ठराव — ग्रामीण विकास विद्याशाखेने प्रस्तावित केलेल्या डिजीटल प्रशासन प्रमाणपत्र शिक्षणक्रमास मान्यता प्रदान करण्यात आली. सादर केलेल्या टिपणीतील शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये दुरुस्ती करून शैक्षणिक वर्ष 2026-27 असे करावे तसेच हा शिक्षणक्रम जानेवारी 2026 पासून सुरू करण्याचे निर्देशित करण्यात आले.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 206.4.3<br>विज्ञान विद्याशाखा | **विज्ञान विद्याशाखेने विद्यापीठात 'School of Technology' ही नवीन विद्याशाखा निर्मिती करण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — विज्ञान विद्याशाखेने विद्यापीठात 'School of Technology' ही नवीन विद्याशाखा निर्माण करण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विज्ञान विद्याशाखेने प्रस्तावित केलेल्या 'School of Technology' ही नवीन विद्याशाखा निर्मितीच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु सदर विद्याशाखा निर्मितीबाबत विद्याशाखेची रचना, आराखडा, तपशील नियोजन मंडळ, विद्वत परिषदेत मांडण्यात यावेत. त्यानंतर मा. व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावेत असे सुचित करण्यात आले. |
| | 206.4.4<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत देण्यात येणारे पुरस्कार 2026 पासून सुरु करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....**<br><br>**टिपणी** — शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील माजी व आजी अध्यापकांनी आणि महाराष्ट्रातील इतर शिक्षक प्रशिक्षकांनी आणि विद्यापीठाने जमा केलेल्या 10 लाख रकमेतून पुढील पुरस्कार देण्यात येणार आहे.<br>डॉ.एम.बी.बुच कृतज्ञता पुरस्कार (निवृत्त शिक्षक प्रशिक्षकांसाठी वय वर्ष 60 / 62 / 65 / 70), डॉ. रवींद्र दावे प्रेरणा पुरस्कार (40 वर्षांच्या आतील शिक्षक प्रशिक्षक), डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार (शिक्षणशास्त्रात भरीव योगदान देणारा ग्रंथ) असे तीन पुरस्कार सन 2026 या वर्षापासून कार्यान्वित करून पुरस्कार देण्याचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत दिले जाणारे डॉ.एम.बी.बुच कृतज्ञता पुरस्कार, डॉ. रवींद्र दावे प्रेरणा पुरस्कार, डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार असे तीन पुरस्कार 2026-27 या वर्षापासून देण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | | **मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सभा समाप्त करण्यात आली.** |

**कुलगुरू तथा अध्यक्ष,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**